**दि. 3/11/22**

**विषय : 19 बिडर्स करून आलेल्या प्राथमिक ऑफर्स ची आपल्या सल्लागारांनी केलेली समरी व त्या वर पंच समिती बरोबर चर्चा.**

3/11/22 ला पंच समिती सदस्यांची आपल्या दोन्ही सल्लागारांन बरोबर त्यांच्या ऑफिस मधे बिल्डर्स कडून आलेल्या ऑफर्स वर सल्लागारांनी जी प्राथमिक कमर्शिअल आणि technical अनालेसिस केली आहे त्या वर सखोल चर्चा झाली. ह्या मीटिंग ला श्री अनंत शाळिग्राम सोडून इतर सर्व पंच समिती सदस्य उपस्थित होते.

सल्लागार श्री कवडिकर यांनी प्रत्येक बिल्डरने आपल्या अपेक्षा पत्रात निर्देशित केलेल्या अपेक्षे प्रमाणे दिलेली माहिती टेबुलर फॉर्म मध्ये मांडली. ह्याच प्रमाणे आपल्या विधी सल्लागार श्रीमती काबरा यांनी प्रत्येक बिल्डर, त्यांच्या कंपनी चा प्रकार आणि त्यांनी त्यांच्या बद्दल दिलेली माहिती लेखी स्वरूपात मांडली. त्यांनी हे ही सांगितले की ह्या दिलेल्या माहिती ची शाहनिशा अजून केलेली नाही. ती प्रोसेस आवश्यकता अनुसार करण्यात येईल.

ह्या सर्व माहिती वरून बिल्डर्स ची A,B,D  अशी वर्ग वारी पण सल्लागारांनी केली आहे आणि हे सर्व डिटेल्स सविस्तर अभ्यास साठी पंच समिती कडे देण्यात आले आहे. पंच समिती ह्या वर सखोल चर्चा करून सल्लागारां शी परत बोलेल आणि नंतर हे सगळे डिटेल्स एका विशिष्ठ मेळाव्यात संस्थेच्या सभासदा समोर चर्चे साठी मांडेल. सर्वांकडून आलेल्या सूचना, प्रश्न ह्यावर विचार विनिमय झाल्या नंतरच  स्पेशल जी. बी. मधे मोजक्या बिल्डर्स ची निवड होणार आहे आणि त्यानंतरच पुनर्निर्माण संबंधी पुढची पावलं टाकण्यात येतील.

**प्रदीप नेवाळकर**
**पंच समिती साठी.**